Brihanmumbai Ganit Adhyapak Mandal, Mumbai

Ganit Adhyayan Adhyapan Vikasan Sanstha, Nashik

and

Pune Jilha Ganit Adhyapak Mandal jointly with

Jnana Prabodhini's Educational Activity Research Centre, Pune

# GANIT PRABHUTWA EXAMINATION (Level -1)

Date: 14-12-2025 Std. V

Total Marks: 75 Time: 2 hours

Instructions: 1. Write only selected alternative for Q1A

2. Write only answers for Q1B

3. Write detailed procedure, steps, explanation for Q2 to Q6

4. Solve all sub-questions in each question.

---

बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, मुंबई

गणित अध्ययन अध्यापन विकसन संस्था, नाशिक

आणि

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ, पुणे यांच्या सहयोगाने

शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी पुणे

# गणित प्रभुत्व परीक्षा (स्तर 1)

दिनांक : 14-12-2025 इयत्ता : पाचवी

एकूण गुण : 75 वेळ : 2 तास

सूचना – 1. प्रश्न क्र. 1 अ साठी फक्त योग्य पर्यायी उत्तर लिहा.

2. प्रश्न क्र. 1 ब साठी फक्त उत्तरे लिहा.

3. प्रश्न क्र. 2 ते 6 साठी सविस्तर रीत, खुलासा, पायऱ्या लिहिणे आवश्यक आहे.

4. सर्व प्रश्नांमधले सर्व उपप्रश्न सोडवा.

**Q.1 A] Choose the correct alternative and write it against the sub-question number** (10

1) Which is the smallest whole number?

A) 0 B) 1 C) 2 D) 100

2) Simplify: $112 - 65 + 20$

A) 47 B) 67 C) 57 D) 197

3) What will be the sum of all even divisors of 40?

A) 90 B) 48 C) 84 D) 44

4) Write the correct relation symbol between $\frac{7}{5}$ and $\frac{7}{6}$.

A) = B) < C) > D) ≤

5) What is the decimal form of $\frac{1}{25}$?

A) 0.4 B) 0.04 C) 0.25 D) 0.025

6) How many grams make three fourth of a kilogram?

A) 500 B) 600 C) 750 D) 800

7) How many pairs of opposite angles does a quadrilateral have?

A) 1 B) 2 C) 3 D) 4

8) A movie starts at 6:45 am and lasts for 2 hours 30 minutes. At what time does it end?

A) 8:30 am B) 9:45 am C) 8:45 am D) 9:15 am

9) What is the product of a pair of reciprocal numbers?

A) 0 B) 1 C) 10 D) 100

10) Which natural number is neither prime nor composite?

A) 2 B) 5 C) 9 D) 1

**Q.1 A] दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून उपप्रश्नाच्या क्रमांकासमोर लिहा.** **(10)**

1) सर्वात लहान पूर्ण संख्या कोणती?

A) 0 B) 1 C) 2 D) 100

2) सरळ रूप द्या: $112 - 65 + 20$

A) 47 B) 67 C) 57 D) 197

3) 40 या संख्येच्या सर्व सम विभाजकांची बेरीज किती होईल?

A) 90 B) 48 C) 84 D) 44

4) $\frac{7}{5}$ आणि $\frac{7}{6}$ या संख्यांमधील संबंध दाखवणारे योग्य चिन्ह कोणते?

A) = B) < C) > D) ≤

5) $\frac{1}{25}$ हे दशांश अपूर्णांक स्वरूपात कसे लिहाल?

A) 0.4 B) 0.04 C) 0.25 D) 0.025

6) तीन चतुर्थांश किलोग्रॅम म्हणजे किती ग्रॅम?

A) 500 B) 600 C) 750 D) 800

7) चौकोनात संमुख कोनांच्या किती जोड्या असतात ?

A) 1 B) 2 C) 3 D) 4

8) एक चित्रपट सकाळी 6:45 वाजता सुरू होतो आणि 2 तास 30 मिनिटे चालतो. तर तो चित्रपट किती वाजता संपेल?

A) म. पू. 8:30 B) म. पू. 9:45 C) म. पू. 8:45 D) म. पू. 9:15

9) दोन गुणाकार व्यस्त संख्यांचा गुणाकार किती असतो?

A) 0 B) 1 C) 10 D) 100

10) मूळ किंवा संयुक्त नसलेली नैसर्गिक संख्या कोणती ?

A) 2 B) 5 C) 9 D) 1

**Q.1 B] Write only answers of the following sub-questions** **(5)**

1) Find and write the LCM of 84 and 90.

2) How many two-digit numbers are there?

3) Convert $\frac{9}{11}$ into decimal form.

4) What is the number of diagonals of a heptagon?

5) Simplify: $(25 + 52) \div 7$.

**Q.2 Solve the following sub-questions.**

1) Product of two fractions is $40\frac{1}{4}$. One of the fractions is $6\frac{11}{18}$. Find and write the other fraction. **(3)**

2) Find and write the simple interest on ₹9000 lent on August 1 and repaid on October 13 of the same year, the rate being 10% p.a. **(3)**

3) Draw a circle of radius 4 cm. Draw any two of its diameters. Draw segments joining end points of the diameters. State the type of the quadrilateral formed. Verify it measuring its angles. **(4)**

**Q.3 Solve the following sub-questions**

1) A car was sold for ₹ 2,09,000 at a loss of 5%. Find and write the cost price of the car. **(3)**

2) A boy runs 24 km in $1\frac{1}{3}$ hours. Find and write his speed in m/s. **(3)**

3) Find and write the GCD and LCM of two numbers 530 and 1113. **(4)**

**Q.1 B] पुढील उपप्रश्नांची फक्त उत्तरे लिहा.** **(5)**

1) 84 आणि 90 या संख्यांचा लसावि काढा.

2) दोन अंकी एकूण संख्या किती?

3) $\frac{9}{11}$ चे दशांश अपूर्णांकात रूपांतर करा.

4) सप्तकोनाला किती कर्ण असतात ?

5) पदावली सोडवा: $(25 + 52) \div 7$.

**Q.2 पुढील उपप्रश्न सोडवा.**

1) दोन अपूर्णांकांचा गुणाकार $40\frac{1}{4}$ आहे. त्यांपैकी एक अपूर्णांक $6\frac{11}{18}$ आहे, तर दुसरा अपूर्णांक काढा. **(3)**

2) एका वर्षी दिनांक 1 ऑगस्टपासून ते 13 ऑक्टोबरपर्यन्त रुपये 9000 सरळव्याजाने दिले. व्याजाचा दर दरसाल 10% असेल तर व्याजाची रक्कम काढा. **(3)**

3) 4 सेमी त्रिज्येचे वर्तुळ काढा. त्या वर्तुळाचे कोणतेही दोन व्यास काढा. व्यासांची टोके जोडणारे रेषाखंड काढा. कोणत्या प्रकारचा चौकोन तयार झाला? त्याच्या कोनांची मापे मोजून पडताळून पहा. **(4)**

**Q.3 पुढील उपप्रश्न सोडवा.**

1) एक कार 5% तोट्याने ₹ 2,09,000 ला विकली. तर त्या कारची खरेदी किंमत किती होती ते काढा. **(3)**

2) एक मुलगा $1\frac{1}{3}$ तासात 24 किमी पळतो, तर त्याचा वेग मी/से मध्ये काढा. **(3)**

3) 530 आणि 1113 या संख्यांचा लसावि आणि मसावि काढा. **(4)**

**Q.4** **Solve the following sub-questions**

1) Find the total distance travelled by Shriya, if she travelled 25.7 km by bus and then 1740 metres by bicycle. **(3)**

2) Arun required one hour to read 16 pages of a book. How much time will he need to read the whole book if it contains 252 pages? **(3)**

3) 6A8B7C is a six-digit odd number divisible by 55. Find and write the value of (A+B). **(4)**

**Q.5** **Solve the following sub-questions**

1) Convert 3 Kg 875 decigram into hectogram. **(4)**

2) Timothi bought a box of 50 chocolates for ₹ 650. He kept some of them for his children and sold the remaining chocolates at ₹16 each and earned a profit of ₹ 22. How many chocolates did he keep for his children? **(4)**

3) The areas of a square and a rectangle are equal. Side of the square is 24 cm and one side of the rectangle is 18 cm. Find and write the length of the other side of the rectangle. **(4)**

4) Using the digits 4, 7, 9; each only once, write all three-digit numbers. Write the difference between the largest and the smallest among them. **(4)**

5) Draw a circle of radius 4 cm. Draw a regular hexagon such that all the vertices of the hexagon will be on that circle. Measure the length of its side. **(4)**

Q.4 **पुढील उपप्रश्न सोडवा.**

1) श्रियाने 25.7 किमी प्रवास बसने व 1740 मीटर प्रवास सायकलने केला, तर तिने एकूण किती किलोमीटर प्रवास केला? **(3)**

2) अरुणला एका पुस्तकाची 16 पाने वाचण्यासाठी एक तास लागतो; तर 252 पानांचे पुस्तक वाचण्यासाठी त्याला किती वेळ लागेल? **(3)**

3) 6A8B7C ही 55 ने पूर्ण भाग जाणारी सहा अंकी विषम संख्या असेल तर (A+B) ची किंमत काढा. **(4)**

Q.5 **पुढील उपप्रश्न सोडवा.**

1) 3 किलो 875 डेसिग्रॅम म्हणजे किती हेक्टोग्रॅम? **(4)**


2) टिमोथीने 50 चॉकलेटांचा एक बॉक्स ₹ 650 ला विकत घेतला. त्यातील काही त्याने आपल्या मुलांसाठी ठेवली आणि उरलेली सर्व प्रत्येकी ₹ 16 ला विकली तेव्हा त्याला ₹ 22 नफा झाला. तर त्याने त्याच्या मुलांसाठी किती चॉकलेट ठेवली? **(4)**

3) एका चौरसाचे आणि आयताचे क्षेत्रफळ समान आहे. चौरसाची बाजू 24 सेमी आहे. आयताची एक बाजू 18 सेमी आहे, यावरून आयताच्या दुसऱ्या बाजूची लांबी काढा. **(4)**

4) 4, 7, 9 हे अंक एकेकदाच वापरून तयार होणाऱ्या सर्व तीन अंकी संख्या लिहा. त्यांपैकी सर्वात मोठ्या आणि सर्वांत लहान संख्यांमधील फरक किती? **(4)**

5) 4 सेमी त्रिज्येचे वर्तुळ काढा. षटकोनाचे सर्व शिरोबिंदु त्या वर्तुळावर येतील असा एक सुसम षटकोन काढा. त्या षटकोनाच्या बाजूची लांबी मोजा आणि लिहा. **(4)**


**Q.6** **Solve the following sub-questions**

1) 


In the adjacent figure, □ABCD is a square of side 10 cm. □BPQC is rectangle. l(BP) = 2.3 cm. Find and write the area of the □APQD. **(5)**

2) On the occasion of *'Rathasaptami'*, 240 boys out of 400 from P.E. School and 280 girls out of 500 from R.J.C.B. School participated a group activity of *'Suryanamaskar'*. Considering the numbers, comparatively which school had better participation? **(5)**

**Q.6** **पुढील उपप्रश्न सोडवा.**

1) 


सोबतच्या आकृतीत □ABCD हा चौरस आहे आणि □BPQC हा आयत आहे. जर l(AB) = 10 सेमी आणि l(BP) = 2.3 सेमी असेल, तर □APQD चे क्षेत्रफळ काढा. **(5)**

2) रथसप्तमीच्या दिवशी पी.ई. या शाळेतील 400 पैकी 240 मुलांनी आणि आर. जे. सी. बी. या शाळेतील 500 पैकी 280 मुलींनी सामूहिक सूर्यनमस्कारांच्या उपक्रमात सहभाग घेतला. संख्यांचा विचार करता कुठल्या शाळेचा सहभाग तुलनेने अधिक चांगला होता? **(5)**